महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे कार्यालय
जागतीक व्यापार केंद्र, सेंटर १, ९ वा मजला,
कफ परेड, मुंबई ४००००५

## जाहीर सूचना

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने (मजनिप्रा) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा केला आहे) चे कलम ११ (घ) व ११ (प) मधील तरतुदीनुसार १ जुलै २०२० ते ३० जुन २०२३ या नियत्रंण कालावधी करिता ठोक जलप्रशुल्काचे पुनर्विलोकन व पुनरिक्षण करण्याची कार्यवाही सुरु केली असून निवडक तज्ञ समुहाच्या सदस्यांनी केलेल्या अभिप्राय/सुचना विचारात घेवून सुधारित केलेल्या ठोक जलप्रशुल्क निकषाच्या मसुद्यास व प्रारुप ठोक जलप्रशुल्क प्रस्तावास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम ११ (घ) च्या तरतुदीनुसार ठोक जलप्रशुल्क निर्धारण करताना लाभार्थ्यांच्या किंवा उपभोक्त्यांच्या मतांची खात्री करुन घेतल्यानंतर सदर ठोक जलप्रशुल्क ठरविणे अनिवार्य आहे. त्या प्रयोजनार्थ ठोक जलप्रशुल्क निकषाचा सुधारीत मसुदा व प्रारुप ठोक जलप्रशुल्काचा प्रस्ताव (मराठी व इंग्रजी भाषांमध्ये) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या www.mwrra.org या संकेतस्थळावर उपलब्ध केले आहेत.

तसेच, सदर प्रारुप मसुदयांच्या प्रती सिंचन विकास महामंडळाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयामध्ये देखील लाभार्थी/उपभोक्त्यांच्या मताची खात्रीकरण्यासाठी उपलब्ध करण्यात येत आहेत.

सबब, सर्व संबंधित लाभार्थी/उपभोक्त्यांना सूचित करण्यात येते की, लाभार्थी/उपभोक्त्यांनी हे प्रारुप निकष व प्रारुप जलप्रशुल्क प्रस्तावांचे काळजीपूर्वक अध्ययन करुन त्यावर त्यांचे काही मत असल्यास त्या पुष्ठ्यर्थ आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरुपात ई-मेलद्वारे secretary@mwrra.in किंवा mwrra@mwrra.in या ई-मेलआयडी वर किंवा संकेतस्थळावर या प्रयोजनार्थ नमुद लिंक वर दिनांक २४ फेब्रुवारी २०२२ पूर्वी सादर करावेत.

तसेच ज्या लाभार्थी/उपभोक्त्यांना ई-मेलव्दारे/लिंक च्या माध्यमातून त्यांचे मत नोंदविणे शक्य नसेल त्यांनी टपालाद्वारे खाली नमूद पत्त्यावर लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रांसह दिनांक २४ फेब्रुवारी २०२२ पूर्वी सादर करावेत.

**सचिव**
**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,**
**जागतीक व्यापार केंद्र, सेंटर १, ९ वा मजला,**
**कफ परेड, मुंबई ४००००५.**

प्रसंगवत येथे असे नमुद करण्यात येते की, सद्यस्थितीत राज्यातील COVID १९ या साथ रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्य शासनाने लागू केलेले निर्बंध लक्षात घेता जनसुनावणी (Public Hearing) घेणे शक्य नाही याची कृपया नोंद घ्यावी.

जाहिर सुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत म्हणजेच दिनांक २४ फेब्रुवारी २०२२ पूर्वी ई-मेलव्दारे/लिंक च्या माध्यमातुन अथवा टपालाव्दारे लाभार्थी/उपभोक्त्यांची प्राप्त मतेच फक्त विचारात घेण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणा-या मतांचा कोणताही विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**(डॉ. रामनाथ सोनवणे)**
**सचिव**
**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण**

**स्थळ: मुंबई**

**दिनांक: २४ जानेवारी, २०२२.**

**टीप:** **मराठी भाषेमध्ये लेखी मत सादर करताना सकल मराठी (Sakal Marathi) या फॉंट चा वापर करावा. तसेच लेखी मत सादर करताना PDF मध्ये आणि Word File या दोन्ही प्रकारात द्यावे.**